# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-४११०१८
## भुमि आणि जिंदगी विभाग

दुरध्वनी क्र. : ०२०-६७३३१५३७ E-mail :Landestate@pcmcindia.gov.in

फॅक्स क्र. : ०२०-२७४२५६०० Website : www.pcmcindia.gov.in


जावक क्र. : भूजि/९/कावि/३४३/२०२३ दिनांक:२५/१० /२०२३

### जाहीर निवेदन -मुदतवाढ

पिंपरी चिंचवड मनपा कार्यक्षेत्रातील पथ विक्रेत्यांचे सर्वेक्षण (विद्यमान पथ विक्रेत्यांसह) हे दि. ०१/११/२०२२ पासून शासनाने विकसित केलेल्या संगणक प्रणालीमध्ये करणेत आलेले आहे व त्यावर हरकती, सुचना घेऊन सदर यादी तयार करण्यात आलेली आहे.

पथ विक्रेत्यांच्या अंतिम यादीमध्ये ज्या पथविक्रेत्यांचे ऑनलाईन सर्वेक्षण पुर्ण झालेले आहे, परंतु दस्तऐवज, आवश्यक कागदपत्र सादर केलेली नाहीत अशा पथविक्रेत्यांची संख्या ५५५५ इतकी आहे. सदरची यादी मुख्य कार्यालय, क्षेत्रिय कार्यालय तसचे मनपाच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सर्वेक्षण झालेल्या अपुर्ण कागदपत्र असणाऱ्या पथ विक्रेत्यांना कागदपत्रांची पुर्तता करणेसाठी दि.२०/१०/२०२३ पर्यंत मुदत देणेत आलेली होती.

सदर मुदत पथविक्रेता समितीचे मान्यतेने दि. ०७/११/२०२३ वाढविणेत आली आहे, तोपर्यंत पथविक्रेत्यांनी संबंधित क्षेत्रिय कार्यालयामध्ये कागदपत्र सादर करावीत. मुदतीनंतर पथ विक्रेता सर्वेक्षणात सहभागी होण्याबाबत कोणतेही अर्ज/निवेदन स्विकारले जाणार नाहीत, याची कृपया नोंद घेणेत यावी.

(विजयकुमार सरनाईक)
सहा.आयुक्त
भुमि आणि जिंदगी विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – १८